# जिल्हाधिकीरी कार्यालय,अकोला.

दुरध्वनी क्र. 0724-2424442
email address -rdc_akola@redimail.com

फॅक्स 0724-2435007
web address :www.akolanic.in

क्र.कक्ष-ससा/अका/कावि- 377 /2020

दिनांक: 18 / 05 /2020

**वाचा: मा.पालकमंत्री,अकोला जिल्हा यांचे विशेष कार्य अधिकारी यांचे पत्र क्र. पा.मंत्री कार्या, अकोला कावि-2500/2020, दिनांक 18/05/2020**

## आदेश

ज्याअर्थी, जिल्ह्यात कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव झपाट्याने वाढत असून मोठ्या प्रमाणात कोरोना विषाणुबाधीत रुग्णांची संख्या वाढत आहे.

ज्याअर्थी, रुग्णालयात रुग्णांची संख्या वाढत असली तरी रुग्णांना द्यावयाचे भोजन, चहा, पाणी नास्ता इत्यादी वितरणव्यवस्थे व्दारे देण्यात येणारे भोजन आरोग्याचे दृष्टीने गुणवत्तापुर्वक असणे अपरिहार्य आहे.

ज्याअर्थी,सदर विषयाबाबत मा.पालकमंत्री महोदयांचे अध्यक्षतेखाली पार पडलेल्या दिनांक 15/05/2020 चे सभेत मा.पालकमंत्री महोदयांनी दिलेल्या निर्देशान्वये व उपरोक्त पत्रान्वये जिल्ह्याकरिता कोविड-19 ची आहार तपासणी समिती गठीत करण्याबाबत खालील प्रमाणे अशासकीय सदस्यांची नावे या कार्यालयास प्राप्त झाली आहेत.

त्याअर्थी, उपरोक्त पत्रात दिलेल्या निर्देशान्वये शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अकोला येथे कोरोना विषाणुग्रस्त म्हणुन उपचार घेत असलेले रुग्णांच्या भोजन व्यवस्थेबाबत **"आहार तपासणी समीत"** खालील प्रमाणे गठीत करण्यात येत आहे.

| अ.क्र. | असासकीय व पदाधिकारी यांचे नाव | समितीतील पद |
|---|---|---|
| **1** | **श्री विजय अग्रवाल,माजी महापौर** | **अध्यक्ष** |
| 2 | श्री मनोज पाटील,समाज सेवक प्रहार जनशक्ती पक्ष | सदस्य |
| 3 | डॉ जिशान हुसेन,नगर सेवक | सदस्य |
| 4 | श्री राजेश मिश्रा,नगर सेवक | सदस्य |
| 5 | श्री रफिक सिद्दीकी,नगर सेवक | सदस्य |
| **6** | **सहा.आयुक्त,अन्न व औषधी प्रशासन विभाग** | **सचिव** |

उपरोक्त मान्यवरांना अवगत करण्यात येते की, शासकीय वैद्यकीय रुग्णालयात कोरोनाग्रस्त रुग्णांना देण्यात येत असलेल्या भोजन व्यवस्था सुव्यवस्थीत व गुणवत्ता पुर्वक आहे कींवा नाही याबाबत आपण GMC ला भेट देऊन रुग्णांची विचारपुस करून तसेच भोजन व्यवस्थीची पाहणी करावी.

काही अडचणी निदर्शनास येत असल्यास भोजन व्यवस्थेत सुधारणा करण्याचे दृष्टीने आवश्यक त्या सूचना व अभिप्राय जिल्हा प्रशासनास अवगत कराव्यात यावे, जेणे करून रुग्णांना गुणवत्ता पुर्वक भोजन उपलब्ध करून देण्याबाबत अधिष्ठाता यांना निर्देशीत करणे सोईचे होईल.

**(जितेंद्र पापळकर,भाप्रसे)**
**जिल्हाधिकारी,अकोला.**

**प्रतिलिपी:**

1. श्री विजय अग्रवाल,माजी महापौर,अकोला मनपा,अकोला.
2. श्री मनोज पाटील, समाज सेवक प्रहार जनशक्ती पक्ष
3. डॉ जिशान हुसेन,नगर सेवक
4. श्री राजेश मिश्रा,नगर सेवक
5. श्री रफिक सिद्दीकी,नगर सेवक
6. श्री मनोज पाटील,
7. जिल्हा शल्यचिकीत्सक,अकोला

यांना माहीती तथा उचित कार्यवाहीस्तव.

8. **सहा.आयुक्त,अन्न व औषधी प्रशासन विभाग**

आपण उपरोक्त सन्माननीय अध्यक्ष व सदस्यांचे संपर्कात राहून समन्वय साधावा, तसेच मा.अध्यक्षांनी आहार तपासणी करिता निर्देशीत केल्यावर तात्काळ उपस्थीत राहून आहार तपासणीबाबत कार्यवाही पार पाडावी. व सदर तपासणीत काही त्रुटी आढळल्यास समितीने दिलेले निर्देशान्वये त्रुटी निवारण करण्याचे नियोजनासह व्यक्तीश: माझे समक्ष सादर करावे.

**(जितेंद्र पापळकर,भाप्रसे)**
**जिल्हाधिकारी,अकोला.**